**दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेंतर्गत विवाह प्रोत्साहन योजना.**

**महाराष्ट्र शासन**

**दिव्यांग सक्षमीकरण विभाग**

**शासन शुद्धीपत्रक, क्रमांक : दिव्यांग-२०२५/प्र.क्र.१७/E-१३७६८६४/कार्यासन-६**

३१,३२,३५ ए, तिसरा मजला, ए-विंग, मित्तल टॉवर,

नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

**दिनांक** :-११ जून, २०२६

**वाचा :-** **१)** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६

**२)** दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, २०१७

**३)** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.: दिव्यांग २०१३/प्र.क्र.१०३/अ.क.२ दि. १७ जून, २०१४.

**४)** शासन निर्णय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग,क्र.: दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.१७/E-१३७६८६४/कार्यासन-६ दि.१८ डिसेंबर, २०२५.

**५)** शासन निर्णय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग,क्र.: दिव्यांग-२०२६/ प्र.क्र.१९२/कार्यासन-९ दि.२८ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना:-**

संदर्भाधिन दिनांक १८.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेच्या अनुदानात वाढ करण्याचा व दिव्यांग-दिव्यांग विवाह हा घटक नव्याने समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांच्या सोईचे होण्यासाठी आणि कार्यपद्धती सुलभ करण्यासाठी सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन शुद्धीपत्रक :-**

दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेंतर्गत विवाह प्रोत्साहन योजनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:

(१) अनुदानाच्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम संबंधित दाम्पत्याने ३ वर्षाकरिता राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेवीमध्ये ठेवावी.

(२) सदस्य सचिव, निवड समितीने मान्य केलेल्या पात्र लाभार्थ्यांची यादी केवळ निधी मागणीसाठी आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांचेकडे सादर करतील.

(३) सदर योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत अनुदानाची पूर्ण रक्कम पती व पत्नीच्या संयुक्त बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल.

(४) जिल्हा कार्यालयाकडून निधीची मागणी घेऊन आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण हे मागणीच्या प्रमाणात जिल्हा कार्यालयासाठी निधी वर्ग करतील.

(५) माहे जानेवारीच्या पहिल्या आठवडयात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मागील वर्षाची माहिती सोबतच्या परिशिष्ट "क" प्रमाणे आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठवावी. सर्व जिल्हयांची संकलित केलेली जिल्हानिहाय एकत्रित माहिती आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, पुणे यांनी शासनास सादर करावी.

(६) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फ़त दिव्यांग व्यक्तींना अशा प्रकारे विवाह योजनेचा लाभ देण्यात येत असेल तर योजनेची द्विरुक्ती टाळण्यासाठी सदर लाभार्थ्यांना योजना निवडीचा विकल्प देण्यात येऊन कोणत्याही एकाच योजनेचा लाभ देण्यात यावा.

(७) इतर सर्व अटी दिनांक १८.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

२. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०६१११२०५१०९५३५ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR

Digitally signed by SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=DEPwD, 2.5.4.20=1FD0BA050AFD8B541478DADD67654A462394D4B092AA83CF80DC3EB2722EF7F1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B36F2DE828CF58932F62F0A5F9320AC750FBA48646152A059F8C4D72B27812AB, cn=SAIPRASAD DATTAGOUD MUKDADWAR
Date: 2026.06.11 12:06:07 +05'30'

**(साईप्रसाद द. मुकदाडवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मंत्री, दिव्यांग सक्षमीकरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. निवड नस्ती, कार्यासन-६

**परिशिष्ट-क**

दिव्यांग सक्षमीकरण विभाग,

जिल्हा परिषद,

सन २० या आर्थिक वर्षातील दिव्यांग-अव्यंग आणि दिव्यांग-दिव्यांग विवाहित जोडप्यांना दिलेल्या अर्थसहाय्याची माहिती.

१) माहे १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत लाभ दिलेल्या

i) दिव्यांग-अव्यंग जोडप्यांची संख्या :

ii) दिव्यांग-दिव्यांग जोडप्यांची संख्या :

२) सन २० या आर्थिक वर्षासाठी प्राप्त तरतुद :

३) प्राप्त तरतुदीपैकी वितरीत करण्यात आलेली तरतुद:

४) प्राप्त तरतुदीपैकी अखर्चित तरतुद :

(सही/-)

मुख्य कार्यकारी अधिकारी